MHNG020029442026

**दि. कि. अर्ज क्र. ५४०/२०२६**
प्रविण शिर्के व ईतर वि. निरंक

<u>निशानि क्र. १ खालील आदेश</u>

सदरचा अर्ज अर्जदार क्र. १ व २ यांनी त्यांच्या नावे कायदेशीर वारस प्रमाणपत्र (Legal Heirship Certificate) मिळण्यासाठी ई–फाईलींगद्वारे केलेला आहे.

२. अर्जदार यांनी त्यांचे अर्जात असे कथन केले की, अर्जदार क्र. १ व २ यांचे वडील नामे शरद राजाभाउ शिर्के यांचे दिनांक १३.०८.२०२४ रोजी निधन झालेले आहे. तसेच, अर्जदार क्र. १ व २ यांची आई नामे मालिनीदेवी शरद राजेशिर्के यांचे दिनांक १९.०८.२०२४ रोजी निधन झालेले आहे. मयत शरद राजाभाउ शिर्के व मयत मालिनीदेवी शरद राजेशिर्के यांना अर्जदार क्र. १ व २ यांच्या व्यतीरीक्त इतर कोणिहि वारस नाहीत. करीता अर्जदार क्र. १ व २ यांना शासकीय तथा निम शासकीय कामाकरीता वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे.

३. अर्जदार यांनी अर्जातील कथनाच्या सत्यतेसाठी अर्जदार क्र. १ यांचे साक्षी पुराव्याचे शपथपत्र ई–फाईलींगद्वारे नि. क्र. ११ वर दाखल केले आहे. अर्जदार क्र. १ यांनी सदर शपथपत्रात अर्जातील कथनांचा पुनःउल्लेख करुन अर्जदारांच्या नावे कायदेशीर वारस प्रमाणपत्र देण्याची मागणी केली असुन अर्ज मंजुर करण्याची विनंती केली आहे.

४. अर्जदारांनी ई–फाईलींगद्वारे कागद यादी निशानि ०४ सोबत अर्जदार क्र. १ व २ यांच्या मुळ आधारकार्ड ओळखपत्राची स्कॅन प्रत, मयत शरद राजाभाउ शिर्के यांच्या मुळ मृत्यु प्रमाणपत्राची व मुळ आधारकार्डची स्कॅन प्रत, तसेच, मालिनीदेवी शरद राजेशिर्के यांच्या मुळ मृत्यु प्रमाणपत्राची व मुळ आधारकार्डची स्कॅन प्रत दाखल केलेली आहे. तसेच,

अर्जदार यांनी ई–फाईलींगद्वारे निशानि १२ वर पुरसीस दाखल करुन त्यांचा पुरावा बंद केलेला आहे.

**५.** अर्जदारांनी अर्जाच्या अनुषंगाने न्यायालयामार्फत मराठी वृत्तपत्र 'नवराष्ट्र प्लस' या दिनांक १५.०५.२०२६ रोजीच्या अंकात जाहीर प्रगटन प्रसिध्द करण्यात आले. मात्र मुदतीत कोणीही आक्षेप नोंदविलेला नाही.

**६.** वरील कागदपत्रांच्या अनुषंगाने माझे असे मत आहे की, अर्जदारांनी मागणी केल्याप्रमाणे अर्जदार क्र. १ व २ हे कायदेशीर वारस प्रमाणपत्र मिळण्यास पात्र आहेत. त्यामुळे कायदेशीर वारस प्रमाणपत्र अर्जदारांच्या लाभात देणे न्यायोचीत होईल म्हणुन मी खालील प्रमाणे आदेश करीत आहे.

<u>आ दे श</u>

१. अर्ज मंजुर करण्यात येत आहे.

२. अर्जदार क्र. १ व २ हे मयत शरद राजाभाउ शिर्के व मयत मालिनीदेवी शरद राजेशिर्के यांचे वारस आहेत हे घोषीत करुन अर्जदारांच्या नावे वारस प्रमाणपत्र आवश्यक ते न्यायालयीन शुल्क भरल्यानंतर जारी करण्यात यावे.

३. अर्जदार यांनी अर्जाचा खर्च सोसावा.

ARCHANA VISHAL KHEDKAR GARAD

Digitally signed by ARCHANA VISHAL KHEDKAR GARAD
Location: Nagpur
Date: 2026.07.09 17:25:47 +0530

**(ए. व्ही. खेडकर – गरड)**
**३ रे सह दिवाणी न्यायाधिश क. स्तर,**
**नागपूर.**

**नागपूर.**
**दिनांक – ०९.०७.२०२६**

## CERTIFICATE

I affirm that the contents of this PDF file of order are true and correct as per the original order.

Sau. P. I. Geed - Stenographer (Grade - III)